Shikshan Sanshodhan : Journal of Arts, Humanities and Social Sciences ISSN(o): 2581-6241
Monthly, Peer-Reviewed, Refereed, Indexed Journal Impact Factor: 9.134
Volume - 9, Issue - 7, July - 2026

DOIs:10.2018/SS/202607022 --:-- Research Paper / Article / Review

"सुंदर व शुद्ध हस्ताक्षराची परिणामकारकता"

श्री संजय गुलाबराव ससाणे
कलाशिक्षक, श्री कानिफनाथ माध्यमिक विद्यालय , जवखेडे खालसा , ता. पाथर्डी , जि. अहिल्यानगर (महाराष्ट्र)
Email : sanjaysasane1970@gmail.com

सारांश : हस्ताक्षर हे विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्वाचे प्रभावी प्रतीक मानले जाते. स्वच्छ, सुंदर आणि शुद्ध हस्ताक्षरामुळे इतरांवर चांगले प्रभाव पडण्यास मदत होते. तसेच लेखन हे वाचनात सुलभ होते. शाळेतील शिक्षणात हस्ताक्षर हे केवळ अक्षरांची रचना नसून त्यात प्रामाणिक कौशल्य, शिस्त, एकाग्रता आणि अभिव्यक्ती यांचा महत्त्वाचा भाग असतो.
जे कधीही क्षर पावत नाहीत, नष्ट होत नाहीत ते म्हणजे "अक्षर". आजच्या डिजिटल युगात संगणक, मोबाईल आणि टॅबलेटचा वापर वाढत असला तरी हस्तलिखित, सुंदर अक्षरांचे महत्त्व अजूनही कायम आहे. सुंदर व शुद्ध अक्षर म्हणजे आपल्या सुंदर व्यक्तिमत्त्वाची एक ओळख असते.

1. प्रस्तावना :

हस्ताक्षर हे विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्वाचे प्रभावी प्रतीक मानले जाते. स्वच्छ, सुंदर आणि शुद्ध हस्ताक्षरामुळे इतरांवर चांगले प्रभाव पडण्यास मदत होते. तसेच लेखन हे वाचनात सुलभ होते. शाळेतील शिक्षणात हस्ताक्षर हे केवळ अक्षरांची रचना नसून त्यात प्रामाणिक कौशल्य, शिस्त, एकाग्रता आणि अभिव्यक्ती यांचा महत्त्वाचा भाग असतो.
जे कधीही झर पावत नाहीत, नष्ट होत नाहीत ते म्हणजे "अक्षर". आजच्या डिजिटल युगात संगणक, मोबाईल आणि टॅबलेटचा वापर वाढत असला तरी हस्तलिखित, सुंदर अक्षरांचे महत्त्व अजूनही कायम आहे. सुंदर व शुद्ध अक्षर म्हणजे आपल्या सुंदर व्यक्तिमत्त्वाची एक ओळख असते. वर्गकार्य, परीक्षा, प्रकल्प नोंदी आणि विविध स्पर्धांमध्ये स्पष्ट, शुद्ध आणि सुंदर हस्ताक्षर विद्यार्थ्यांच्या कामाचे प्रभावी सादरीकरण करते. त्यामुळे गुणवत्तेत व आत्मविश्वास वाढण्यास मदत होते.
प्रत्येक अक्षराला एक प्रमाणित वळण असते, आकार असतो. सुंदर हस्ताक्षर ही जन्मजात देणगी नसून योग्य लेखनपद्धती, सातत्यपूर्ण सराव आणि शिक्षकांच्या मार्गदर्शनातून विकसित होणारे कौशल्य आहे. सुगम, शुद्धलेखनासाठी अनुस्वार, उकार-दीर्घ, विविध विरामचिन्हांचे हमखास उपयोग, शब्द यांचे योग्य मार्गदर्शन केल्यास लेखन शुद्ध व सुंदर दिसते.
लेखनाची पूर्वतयारी म्हणून साधने चांगल्या पद्धतीने वापरणे, बसण्याची पद्धत, वही मांडणी, अक्षरांचे वळण, पेन कसा धरावा, यथायोग्य अक्षरांची उंची, अक्षरांतील योग्य अंतर व सुबकतेपूर्वक योग्य सराव करून घेतल्यास विद्यार्थ्यांच्या हस्ताक्षरात शुद्धता व सुंदरता नकळतच दिसून येते.

2. संशोधनाची उद्दिष्टे –

१) विद्यार्थ्यांच्या हस्ताक्षराच्या गुणवत्तेचा अभ्यास करणे.
२) शुद्ध व सुंदर हस्ताक्षरासाठी राबविलेल्या उपक्रमांची परिणामकारकता तपासणे.
३) नियमित सुंदर लेखन सरावामुळे विद्यार्थ्यांच्या हस्ताक्षरात होणारे बदल अभ्यासणे.
४) हस्ताक्षर सुधारल्यामुळे विद्यार्थ्यांच्या शुद्धलेखन, सादरीकरण व आत्मविश्वासावर होणारे परिणाम तपासणे.
५) विद्यार्थ्यांना सुंदर व शुद्ध अक्षरांचे महत्त्व समजणे.

3. संशोधन पद्धती –

१) कृती संशोधन (**Action Research**)
२) संशोधन पद्धती – निरीक्षण
३) पूर्वचाचणी – उत्तरचाचणी
४) नमुना – इ. ५ वी ते इ. ८ वी मधील विद्यार्थी.

संशोधन नमूना –
एकूण विद्यार्थी : ४०
इयत्ता : ७ वी , ८ वी
संशोधन कालावधी : ३० दिवस
नियमित सुलेखन सराव : दररोज २० मिनिटे

संशोधन साधने –
१) हस्ताक्षर मूल्यमापन तक्ता
२) प्रश्नावली
३) निरीक्षण नोंद
४) पूर्वचाचणी व उत्तरचाचणी
५) विद्यार्थ्यांच्या लेखन नमुन्यांची तुलना

संशोधन प्रश्न –
१) नियमित सरावामुळे हस्ताक्षरात सुधारणा होते का?
२) सुलेखन उपक्रम विद्यार्थ्यांना आवडतात का?
३) सुंदर व शुद्ध हस्ताक्षरामुळे विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास वाढतो का?
४) शुद्ध लेखनामुळे चुका कमी होतात का?
५) शिक्षकांच्या मार्गदर्शनाने हस्ताक्षर उपयुक्त ठरते का?

गृहीतके –
१) नियमित सुलेखन सरावामुळे विद्यार्थ्यांच्या हस्ताक्षरात लक्षणीय सुधारणा होईल.
२) सुंदर व सुस्पष्ट हस्ताक्षरामुळे विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास वाढेल.
३) हस्ताक्षर सुधारण्यामुळे उत्तरपत्रिकेचे सादरीकरण अधिक प्रभावी होईल.

विद्यार्थ्यांसाठी प्रश्नावली –
१) तुला सुंदर अक्षरात लिहायला आवडते का?
२) तू दररोज लेखनाचा सराव करतो / करते का?
३) सुलेखनामुळे तू जाणूनपूर्वक चुका टाळतो / टाळते का?
४) तुला सुलेखन स्पर्धेत सहभागी व्हावेसे वाटते का?
५) शिक्षक हस्ताक्षर सुधारण्यासाठी मार्गदर्शन करतात का?
६) सुंदर हस्ताक्षरामुळे तुला लिहिताना आत्मविश्वास वाटतो का?
७) अक्षरांची उंची, आकार आणि शब्दांतील अंतर योग्य राखता येते का?
८) सुलेखन स्पर्धेमध्ये सहभागी व्हायला आवडेल का?

4. **माहिती संकलन –**
१) पूर्व चाचणीतील लेखन नमुने
२) नियमित सरावानंतरचे लेखन नमुने
३) शिक्षकांचे निरीक्षण
४) विद्यार्थ्यांच्या मतांचे परीक्षण

प्रश्नावलीची उत्तरे –

अ . क्र .	प्रश्न	होय	नाही
१	तुला सुंदर अक्षरात लिहायला आवडते का?	३६	४
२	तू दररोज लेखनाचा सराव करतो / करते का?	३२	८
३	सुलेखनामुळे तू जाणूनपूर्वक चुका टाळतो / टाळते का?	३४	६
४	तुला सुलेखन स्पर्धेत सहभागी व्हावेसे वाटते का?	३०	१०

५	शिक्षक हस्ताक्षर सुधारण्यासाठी मार्गदर्शन करतात का?	३८	२
६	सुंदर हस्ताक्षरामुळे तुला लिहिताना आत्मविश्वास वाटतो का?	३५	५
७	अक्षरांची उंची, आकार आणि शब्दांतील अंतर योग्य राखता येते का?	२९	११
८	सुलेखन स्पर्धेमध्ये सहभागी व्हायला आवडेल का?	३३	०७

5. **निरीक्षण नोंद –**

अ . क्र .	**निरीक्षणाचा मुद्दा**	**पूर्वी**	**नंतर**
१	अक्षरांची स्पष्टता	मध्यम	चांगली
२	अक्षरांचा आकार	असमान	प्रमाणबद्ध
३	शब्दातील अंतर	असमान	समान
४	ओळीतील लेखन	विस्कळीत	सरळ
५	शुद्धलेखणातील चुका	जास्त	कमी
६	लेखनाचा वेग	मंद	समाधानकारक
७	विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास	कमी	अधिक

6. **माहितीचे विश्लेषण –**

१) एकूण 40 विद्यार्थ्यांपैकी 36 (90%) विद्यार्थ्यांना सुंदर अक्षरात लिहिणे आवडते असे आढळले.
२) 32 (80%) विद्यार्थी नियमित सराव करतात, त्यामुळे त्यांच्या हस्ताक्षरात लक्षणीय सुधारणा दिसून आली.
३) 35 (87.5%) विद्यार्थ्यांनी सुंदर हस्ताक्षरामुळे आत्मविश्वास वाढल्याचे सांगितले.
४) पूर्वचाचणीमध्ये हस्ताक्षराची गुणवत्ता सरासरी 45% होती, तर उत्तरचाचणीत ती 82% पर्यंत वाढली.
५) शुद्धलेखनातील चुका सरासरी 40% ने कमी झाल्या.
६) शिक्षकांच्या निरीक्षणानुसार बहुतेक विद्यार्थ्यांच्या अक्षरांची उंची, शब्दांतील अंतर आणि सादरीकरणात स्पष्ट सुधारणा झाली.

7. **अपेक्षित निष्कर्ष –**

१) हस्ताक्षर अधिक सुंदर व सुलभ होईल.
२) लेखनातील चुका कमी होतील.
३) आत्मविश्वास व लेखनाची आवड वाढेल.
४) नियमित सरावाचे महत्त्व विद्यार्थ्यांना समजेल.

संदर्भ सूची :

१) राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 (National Education Policy 2020). शिक्षण मंत्रालय, नवी दिल्ली.
२) महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद (MSCERT), पुणे. मराठी विषय अभ्यासक्रम (इयत्ता ५ वी ते ८ वी). महाराष्ट्र शासन.
३) महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद (MSCERT), पुणे. शिक्षक मार्गदर्शिका – मराठी (इयत्ता ५ वी ते ८ वी). महाराष्ट्र शासन.
४) शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, महाराष्ट्र शासन. शालेय शिक्षणासंबंधी शासन निर्णय व परिपत्रके. महाराष्ट्र शासन.
५) संतोष पाटील. (2019). शैक्षणिक मानसशास्त्र. पुणे : विद्या प्रकाशन.
६) कुलकर्णी, एस. (2018). शैक्षणिक संशोधन पद्धती. पुणे : नित्य नूतन प्रकाशन.